**सर्व शासकीय कार्यालयामध्ये अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्याबाबत.**

# परिपत्रक

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जा.क्र/साप्रवि-१/रवका/२८५/२०२५**
**अहिल्यानगर दिनांक- २८/०७/२०२५**

**वाचा -**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडिल परिपत्रक क्र संकिर्ण २०१६/ प्र.क्र.(२०४/१६) सहा. दि. २३/११/२०१६

**परिपत्रक -**

सदर शासन परिपत्रकानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्याबाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत प्रत्येक शासकिय कार्यालयामध्ये अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्यात यावेत, सदर फॉर्म ई-मेल व्दारे सेवा पुरविणा-या नोडल प्राधिकरण/पर्यवेक्षकाकडेही पाठविण्यात यावेत. सदर अभिप्रायाचे फॉर्म प्रत्येक तिमाहीला संबंधित अधिका-यासमोर उघड करण्यात यावेत आणि सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या जनतेबरोबरच्या वागणुकीच्या अनुषंगाने त्यांच्या गोपनीय अहवालात मुल्यमापन करण्यासाठी वापरण्यात यावेत.

सदर परिपत्रकामधील सुचनाची अंमलबजावणी करण्यास कुचराई करण्या-या संबधीत अधिकारी यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्यांचा सकेतांक क्रमांक 202507280401 37 -- असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 06-08-2025 21:50:21
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१.खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),जिल्हा अहिल्यानगर

२/- सर्व खाते प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी आपले कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे सदर शासन परिपत्रक निदर्शनासआणावे व त्यानुसार कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरी XXX
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर